# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आलोसे क्र.०१** श्री.प्रविण गोविंदराव मोंढे,वय ४५ वर्ष,व्यवसाय—नोकरी,पद—अपर कोषागार अधिकारी,बुलढाणा वर्ग—२ ह.मु.फ्लॅट A-५माढा कॉलनी,ता.जि.बुलढाणा रा.सिटी क्लासिक अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०१, शेगाव राहटगाव रोड, अमरावती ता.जि.अमरावती.<br>**आलोसे क्र.०२** श्री.विनोद अब्बास घट्टे,वय ४३ वर्ष, व्यवसाय नोकरी,पद—कनिष्ठ लेखापाल, वर्ग—३ जिल्हा कोषागार कार्यालय,बुलढाणा, ह.मु.श्री.पाटील, यांचे घरी भाडयाने,जिजामाता नगर ता.जि.बुलढाणा रा. देशमुख कॉलनी,सोनाळा ता.संग्रामपूर जि. बुलढाणा.<br>**आलोसे क्र.०३**.श्री.जीवन पांडूरंग काळे,वय ३४ वर्ष, व्यवसाय नोकरी, पद— लेखा लिपीक, वर्ग—३ जिल्हा कोषागार कार्यालय,बुलढाणा,, रा. सव ता.जि.बुलढाणा. |
| लाच मागणी | २०,०००/—रुपये |
| लाच स्विकारली | तडजोडी अंती १५,०००/— रुपये |
| घटना स्थळ | जिल्हा कोषागार कार्यालय, बुलढाणा. |
| घटना तारीख | २७.०२.२०२५ |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार यांचे वडील सन—२०२२ मध्ये पोलीस विभागातून सेवानिवृत्त होवून सन—२०२५ मध्ये मयत झाले आहे. तक्रारदार याच्या वडीलांच्या मृत्युनंतरची फॅमीली पेंशन आईच्या नावे सुरू करण्यासाठी जिल्हा कोषागार कार्यालय,बुलढाणा येथील अपर कोषागार अधिकारी श्री.मोंढे व लिपीक श्री.घटटे आणि लिपीक श्री.काळे हे २०,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार दिनांक २६.०२.२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.मोंढे, अपर कोषगार अधिकारी, लिपीक श्री.घटटे आणि लिपीक श्री.काळे यांनी तक्रारदार यांना २०,०००/— रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती १५,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. त्यावरून आज दि.२७.०२.२०२६ रोजी आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान जिल्हा कोषागार अधिकारी कार्यालय मधील अपर कोषगार अधिकारी श्री.मोंढे, लिपीक श्री.काळे, यांचे समक्ष लिपीक श्री.घटटे यांना अपर कोषागार अधिकारी यांचे दालनामध्ये तक्रारदार यांचेकडून १५,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले.

त्यावरुन **आलोसे क्र.०१** श्री.प्रविण गोविंदराव मोंढे, अपर कोषागार अधिकारी, **आलोसे क्र.०२** श्री. विनोद अब्बास घट्टे, पद—कनिष्ठ लेखापाल, व **आलोसे क्र.०३**.श्री.जीवन पांडूरंग काळे, पद— लेखा लिपीक, यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदर कार्यवाही :—**

१.मा.श्री.बापू बांगर,पोलीस अधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
मों.नं.९०११३२३४२६

२.मा.श्री.सचिंद्र शिंदे,अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
मों.नं.९७६४२१०४८५

३.मा.श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा.
मों.नं.९५५२५२०१८८

यांचे मार्गदर्शना खाली श्री.रमेश पवार,पोलीस निरीक्षक श्री.विलास गुसिंगे पोलीस निरीक्षक व सफौ शाम भांगे, पोहेकॉ प्रविण बैरागी, राजेद्र क्षिरसागर, सुभाष मांटे, दिपक जाधव, अमोल झिने, पोना जगदीश पवार, पोकॉ. गजानन गाल्डे, रंजीत व्यवहारे, शैलेश सोनवणे, लक्ष्मीकांत इंगळे, रतन गिरी, मपोहेकॉ अनिता वारंगणे,मपोकॉ स्वाती वाणी, चापोहेका नितीन शेटे, अर्शद शेख सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.येथे दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व व्हाटस अप क्रमांक ९४०५०९१०६४ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधून तक्रार करण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

(भागोजी चोरमले)
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा